# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


३३० - २३ दिनांक : - २२/०९/२०२३

## ब्राऊन शुगर (गर्दा) नावाचा अमली पदार्थ विक्री करणाऱ्या आरोपीतांस अटक पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगीरी.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दि. १८/०९/२०२३ रोजी दोन इसम ब्राऊन शुगर या अंमली पदार्थाची विक्री करण्यासाठी आप्पा मैदान, नवजिवन शांतीनगर, ता.वसई जि. पालघर येथे येणार असल्याबाबतची बातमी सपोनि सोपान पाटील यांना त्यांच्या गुप्त बातमीदारामार्फत प्राप्त झाल्याने सपोनि सोपान पाटील यांनी सदरबाबत मा. वरिष्ठांना कळविले असता मा. वरिष्ठांनी कायदेशिर कारवाई करण्याबाबत आदेश दिले. सदर आदेशान्वये वरिष्ठ पोलीस निरीक्षक वसंत लब्दे, यांनी पोलीस निरीक्षक, गुन्हे, श्री. विजय पाटील, गुन्हेप्रकटीकरण कक्षाचे सपोनि सोपान पाटील, व अंमलदार असे पोलीस पथक तयार करुन त्यांना कायदेशिर कारवाई करण्याबाबत आदेश दिले.

सदर बातमीच्या आधारे पोलीस निरीक्षक, गुन्हे श्री. विजय पाटील, गुन्हेप्रकटीकरण कक्षाचे स.पो.नि. पाटील, पो.हवा. योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, पो.अं. रवि वानखेडे, संजय मासाळ, किरण आव्हाड, राहुल कर्पे, निखील मंडलिक, दिलदार शेख, सुजय पाटील यांनी आप्पा मैदान, नवजिवन वसई पुर्व ता. वसई जि. पालघर येथे सापळा रचुन आरोपीत नामे - १) अलीम इलाही सय्यद, वय २३ वर्षे, रा. वसई पुर्व, ता. वसई जि. पालघर २) उमेश राजाभाऊ सुर्यवंशी, वय २१ वर्षे, रा. वालीव वसई पुर्व ता. वसई जि. पालघर यांना ताब्यात घेऊन दोन पंचासमक्ष अंगझडती घेतली असता त्यांच्या ताब्यात २५.६०० ग्रॅम वजनाचा २,५६,०००/- रुपये किंमतीचा ब्राऊन शुगर (गर्दा) नावाचा अंमली पदार्थ मिळुन आला असुन सदरबाबत पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि. क्र. ८६८/२०२३ एन.डी.पी.एस. ॲक्ट-१९८५ चे कलम-८(क), २१(ब), प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ- ३, विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त सो, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. वसंत लब्दे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. विजय पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. शिवानंद देवकर, पोलीस निरीक्षक (प्रशासन) पेल्हार पोलीस ठाणे, पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे स.पो.नि. सोपान पाटील, पो.हवा.योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, पो.अं.रवि वानखेडे, संजय मासाळ, निखील मंडलिक, किरण आव्हाड, राहुल कर्पे, दिलदार शेख, अनिल साबळे, सुजय पाटील, यांनी यशस्वीरित्या पार पाडली असुन सदर गुन्हाचा पुढील तपास पोलीस उप. निरीक्षक तुकाराम भोपळे हे करत आहे.



---ooo---